लोकमत



एमजीएम रुग्णालयाला फेस शील्ड देताना डॉ. प्रवीण सूर्यवंशी, कुलसचिव आशिष गाडेकर, डॉ. आर.आर. देशमुख, प्रा. पंकज ढोबळे, प्रा. प्रणव घोडके .

# एमजीएम विद्यापीठातर्फे डॉक्टर फेस शील्डची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** सध्या कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी पोलीस आणि डॉक्टर प्रचंड परिश्रम घेत आहेत. या सर्व पोलीस आणि डॉक्टरांना संरक्षण म्हणून एमजीएम विद्यापीठातर्फे फेस शील्ड तयार करून त्यांचे वाटप करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू सुधीर गव्हाणे, कुलसचिव आशिष गाडेकर यांनी ही कल्पना सुचवली. जेएनईसी इनोव्हेशन सेंटर, मेरिंगो लॅब्स, पीएनपी टेक्नोकॅड यांच्या संयुक्त प्रयत्नातून एक सुयोग्य आणि दर्जेदार डिझाईन निश्चित करण्यात आले. विशेष म्हणजे इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर औरंगाबादतर्फे अध्यक्ष दिलीप गौर यांनी प्रथम १०० शील्ड प्रायोजित केले. मागील दोन दिवसांत चिकलठाणा येथील मिनी घाटी, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय आणि ग्रामीण पोलिसांसाठी, असे एकूण २०० शील्ड वितरित करण्यात आले. सदरील शील्ड तयार करण्यासाठी डॉ. आर.आर. देशमुख, प्रा. पंकज ढोबळे, प्रा. प्रणव घोडके, प्रा. लहाने, सुशांत महाजन यांनी परिश्रम घेतले. अजूनही शील्ड तयार करणे चालू असून, जिथे गरज असेल तिथे शील्ड पुरवणार आहे.